आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २६० वा ● शुक्रवार दि. ०१ मार्च २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## 'लोकराज्य' फेब्रुवारी २०२४ चा अंक प्रकाशित

मुंबई, : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित लोकराज्य मासिकाचा फेब्रुवारी २०२४ चा अंक प्रकाशित करण्यात आला आहे. नुकताच विधानसभेमध्ये अंतरिम अर्थसंकल्प मांडण्यात आला. समाजातील सर्व घटकांना न्याय आणि विकासाची संधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात केला आहे.




या अर्थसंकल्पाचा आढावा या अंकात घेण्यात आला आहे. याचबरोबर राज्य सरकारने या दीड वर्षात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले या निर्णयांचा आढावाही या अंकात घेण्यात आला आहे. तसेच मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने तज्ज्ञ मान्यवरांचे लेख या अंकात समाविष्ट करण्यात आले आहेत. हा अंक माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या https://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर तसेच https://mahasamvad.in/ या पोर्टलवर मोफत उपलब्ध आहे.

# उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव द्या अन्यथा शेतकऱ्यानां अफुची शेती करण्याचा परवाना द्यावा !

लातूर – भारतीय किसान संघ परिसंघ अर्थात सिफा या शिखर संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी शेतकरी हिताच्या मागण्या भारत सरकार व राष्ट्रपतींकडे केल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव देण्यात यावा अन्यथा शेतकऱ्यांना अफूची शेती करण्याचा परवाना देण्यात यावा या व इतर मागण्यांचे निवेदन आज २९ फेब्रुवारी रोजी दुपारी दीड वाजण्याच्या दरम्यान शेतकरी संघटनेचे नूतन जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे, संघटनेचे राज्य उपाध्यक्ष सुरेंद्र अंबुलगे व युवा आघाडीचे प्रदेश अध्यक्ष मिथून दिवे यांच्या नेतृत्वाखाली लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांना देण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना विनाअट संपूर्ण कर्ज माफ करण्यात यावे, दुष्काळाचे अनुदान, विमा लागू करून शेतकऱ्यांना तात्काळ देण्यात यावा, बँकांनी सक्तीची कर्जवसुली बंद करावी उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव द्यावा अन्यथा अफुची शेती करण्याचा परवाना देण्यात यावा, शेतकऱ्यांनी किटकनाशके, बियाणे, ट्रॅक्टर, कृषी यंत्रे यावरील जीएसटी काढून टाकण्यात यावी. मनरेगाच्या ८० टक्के निधी कृषी कामांशी जोडण्यात यावा. सर्व पिकांसाठी




किमान आधारभूत किंमत ठरवावी. कृषी उत्पादनावरील निर्यात बंदी उठवावी, शेतकऱ्यांना विमा कंपनी निवडण्याचा पर्याय देण्यात यावा, साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत देणी तात्काळ द्यावीत, बंद साखर कारखाने सुरु करावेत अशा विविध बारा मागण्यांचा सदर निवेदनात समावेश आहे.

या मागण्यांचे निवेदन लातूर जिल्हाधिकाऱ्यांना देणाऱ्या शिष्टमंडळात शेतकरी संघटनेचे लातूरचे नुतन जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे, राज्य उपाध्यक्ष सुरेंद्र अंबुलगे, युवा प्रदेशाध्यक्ष मिथून दिवे, तालुकाध्यक्ष विकास नमनगे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय देवाप्पा, महेश बंग, विजयकुमार पाटील, अर्जुन जाधव, प्रतीक तेलंग यांच्या शेतकरी संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दहावीच्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण मंत्र्यांकडून शुभेच्छा

मुंबई, : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि



उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या इयत्ता १० वीच्या लेखी परीक्षांना आज शुक्रवार दि. १ मार्च २०२४ पासून सुरूवात होत आहे. परीक्षा सुरळीत पार पडाव्यात यासाठी शासन विविध उपाययोजना करीत असून विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने परीक्षा द्याव्यात, असे आवाहन करून शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमध्ये इयत्ता १० वी साठी एकूण ५०८६ केंद्रांवर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी २३ हजार २७२ शाळांमधून एकूण १६ लाख ०९ हजार ४४५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असल्याची माहिती, शिक्षण मंडळामार्फत देण्यात आली आहे.

परीक्षा सुरळीत व्हाव्यात यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शासनामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. यामुळे विद्यार्थ्यांनी तणावमुक्त आणि भयमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी, असे आवाहन मंत्री श्री.केसरकर यांनी केले आहे.

## ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा सर्वांगीण विकास करणार ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन

मुंबई, : ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा सर्वांगीण



विकास करणार असल्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले व यांच्या समवेत सर्व ह. भ. प. महंत शिवाजी महाराज, लक्ष्मण दशरथ मेंगडे, परमेश्वर गणपत बोधले, लक्ष्मण् बाबुराव तकीक, विरुपाक्ष शिवाचार्य महास्वामी, राधाबाई ज्ञानोबा सानप यांच्यासह महाराष्ट्रातील अनेक संत महंत, कीर्तनकार आदिंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांचा विधीमंडळात सत्कार केला व आभार व्यक्त केले. ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या 'ब' वर्गातील तीर्थक्षेत्रांचा पायाभूत विकास होण्याकरिता शाश्वत वाढीव निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेला नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान मंजुरी देण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून तीर्थक्षेत्रांना सुमारे २००० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला जात आहे. तसेच पर्यटन विभागामार्फत देखील प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत सुमारे १००० कोटी रुपयांचा निधी तीर्थक्षेत्रांच्या पर्यटन विकासासाठी उपलब्ध करुन दिला आहे.

प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या 'भव्य काशी दिव्य काशी', बद्री केदार देवस्थान विकास, उज्जैन येथील महाकाल कॉरिडॉर, अयोध्यास्थित प्रभू श्रीराम जन्मभूमी मंदिर विकास या संकल्पनेच्या धर्तीवर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महत्वपूर्ण अशा 'ब' वर्गातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेस मंजुरी देण्यात आली. आता 'ब' वर्गातील तीर्थक्षेत्रांना दोन कोटी ऐवजी पाच कोटींचा विकासनिधी उपलब्ध होत आहे. ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविक आणि यात्रेकरुंना विविध सोयीसुविधा पुरविणे आवश्यक आहे. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नामुळे या सोयीसुविधा पुरविणे शक्य होत नाही. म्हणून शासनाने ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी पाच कोटींचा निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय नागपूर येथे झालेल्या बैठकीत मंत्रिमंडळाने घेतला. १६ नोव्हेंबर २०१२ नंतर २ कोटी या मर्यादेत निधी मंजूर केलेल्या तिर्थक्षेत्रांना नविन प्रस्तावित निकषाप्रमाणे ३ कोटी इतका निधी मंजूर करण्यात येत आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मंदिरापर्यंत रस्ते, पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणे, स्वच्छतागृह, शौचालय, वाहनतळ, भक्त निवास, रस्त्यावरील दिवे आणि संरक्षण भिंत, वृक्ष लागवड करणे इत्यादी सुविधा या निधीतून उपलब्ध करुन दिल्या जातील. राज्यात 'ब' वर्ग दर्जा असलेली एकूण ४८० तीर्थक्षेत्र आहेत. या तीर्थक्षेत्रांना वाढीव निधीचा लाभ होणार आहे.

# विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र प्रथम मंत्री उदय सामंत

मुंबई, : दाओस येथील आंतरराष्ट्रीय उद्योग प्रदर्शनामध्ये मागील वर्षी सहभागी होत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील शिष्टमंडळाने विविध आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीसाठी केलेल्या एक लाख ३७ हजार कोटी रुपये इतक्या करारांपैकी ७३ टक्के प्रकल्पांची आत्तापर्यंत राज्यात प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली आहे. गेले १६ महिने महाराष्ट्र विदेशी गुंतवणुकीत देशात प्रथम क्रमांकावर असल्याची माहिती, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

विधानपरिषदेत नियम २६० अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या चर्चेत उत्तर देताना मंत्री श्री.सामंत बोलत हाते. या चर्चे त विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, प्रवीण दरेकर यांच्यासह विविध सदस्यांनी सहभाग घेतला.

राज्यामध्ये जेम्स व ज्वेलरी संबंधित उद्योगांमध्ये ५० हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले आहेत. उद्योग विभागासह नगर विकास, पर्यावरण, गृहनिर्माण, तलाठी भरती, दुग्ध व्यवसाय विकास आदी विभागांशी संबंधित मुद्द्यांवर मंत्री श्री.सामंत यांनी माहिती दिली.

मुंबईकरांचा प्रवास वेगवान करणारा कोस्टल रोडचे काम अंतिम टप्प्यात असून पहिल्या टप्प्याचे लवकरच लोकार्पण करण्यात येईल.




मुंबई महानगरपालिकेच्या विविध प्रश्नांवर बोलताना त्यांनी रस्ते विकास, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न, जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास, सीआरझेड, रिक्त पदे भरती आणि मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी मुंबई शहरात सुरू केलेल्या स्वच्छता (डीप क्लिनिंग ड्राइव्ह) मोहिमेमुळे मुंबईतील प्रदुषणाची पातळी कमी झाली आहे. ही मोहीम राज्यातील इतर शहरातही राबविण्यात येणार आहे. इमारतींचा पुनर्विकास करताना प्रथमत: मालकाची जबाबदारी असून त्यानंतर भाडेकरूंनी पुनर्विकासाची कार्यवाही करणे गरजेचे आहे. हे झाले नाही तर नंतर यंत्रणांकडून कार्यवाही केली जाईल, असेही मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले.

मंत्री श्री. सामंत विविध विभागांशी संबंधित बाबींवर बोलताना म्हणाले, तलाठी भरती बाबत न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही होत असून नेमण्यात आलेल्या टीसीएस या एजन्सीद्वारे पारदर्शकपणे भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. महानंदाशी संबंधित कामगारांच्या पगाराच्या प्रश्नासह विविध बाबी निकालात काढण्यासाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येईल. महानंदाच्या एसआरए स्कीममध्ये काही अनियमिता झाली असेल तर, चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असे मंत्री श्री. सामंत यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मंत्री उदय सामंत यांनी गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी चांगले काम होत असून नोंद झालेल्या पात्र गिरणी कामगारांपैकी १५ हजार कामगारांना घरे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तर उर्वरित कामगारांना घरे देण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात विविध ठिकाणी जमीन उपलब्ध करून दिली जाणार असून त्यापैकी ठाणे येथे २२ हेक्टर जागा उपलब्ध केली असल्याचेही मंत्री श्री.सामंत यांनी सांगितले.

## 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रांचा विकासनिधी वाढवून ५ कोटी केल्याबद्दल वारकरी बांधवांनी मानले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार

मुंबई, :– महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भरणाऱ्या यात्रा–जत्रांना भाविकांच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. या तीर्थक्षेत्रांना वर्षभर भेटी देणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील ब वर्ग तीर्थक्षेत्रांच्या परिसरात पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने निधीची मर्यादा २ कोटी रुपयांवरून ५ कोटी रुपये इतकी वाढविली आहे. राज्यातील आध्यात्मिक क्षेत्राच्या विकासाच्यादृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेतल्याबद्दल अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप प्रकाश बोधले महाराज यांच्यासह वारकरी संप्रदायातील प्रमुख महाराजांनी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांची आज भेट घेऊन त्यांचे आभार मानले.



महाराष्ट्राला तीर्थक्षेत्रांची, संत–महात्म्यांची समृद्ध परंपरा लाभली आहे. या तीर्थक्षेत्रांचा विकास करतानाच याठिकाणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविक–भक्तांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनातर्फे भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यादृष्टीने मोठ्या ग्रामीण तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना सुरु करण्यात आली आहे. याअंतर्गत अ–वर्ग तीर्थक्षेत्रांसाठी निधीची मर्यादा '२ कोटी रूपये ते २५ कोटी रूपये' वरून '५ कोटी रूपये ते २५ कोटी रूपये' इतकी वाढविली आहे. तसेच, लहान ग्रामीण तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना ब–वर्ग साठीच्या निधीची मर्यादा २ कोटी रुपयांवरून ५ कोटी रुपये इतकी वाढविली आहे. या निर्णयामुळे राज्याच्या आध्यात्मिक विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे, असे मत वारकरी बांधवांनी यावेळी व्यक्त केले. राज्यातील तीर्थस्थळे हा समाजाचा भावनात्मक ठेवा आणि आध्यात्मिक संस्कार केंद्रे आहेत.

त्यामुळे शासनाने वारकरी बांधवांनी केलेल्या मागणीचा भावनात्मक आणि व्यावहारिक पातळीवर विचार करून धाडसी निर्णय घेतला आहे. राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीमुळे तीर्थक्षेत्रांचा पर्यटनदृष्ट्या देखील विकास होणार आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ४७९ ब वर्ग देवस्थानांना होणार आहे. त्यामुळे ब वर्ग तीर्थक्षेत्रावर येणारा प्रत्येक भाविक आपले मनापासून आभार मानत आहे, अशी सामूहिक भावनाही वारकरी बांधवांनी यावेळी व्यक्त केली.

# आ. अभिमन्यू पवार यांचा पाठपुरावा.. ४३ कोटींच्या औसा वाढीव वस्ती पाणीपुरवठा योजनेला प्रशासकीय मंजुरी..

औसा : ५० कोटी रुपये खर्च करून औसा शहराला निम्न तेरणा धरणातून पाणी मिळाल्याने आमदार अभिमन्यू पवार यांच्या कामावर औसेकर समाधानी असताना आता ४३ कोटींच्या औसा वाढीव वस्ती पाणीपुरवठा योजनेला प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.या पुढील ५० वर्ष शहरातील चारही बाजुला तसेच प्रस्तावित वस्त्यांमध्ये या वाढीव पाणीपुरवठा योजनेचा मोठा फायदा होणार आहे. राज्यातील क वर्ग नगरपालिका असणाऱ्या औसा नगरपालिकेला तेरणा धरणातून या अगोदर ५० कोटींची पाणीपुरवठा योजना व आता वाढीव वस्तीसाठी ४५ कोटीची योजना मंजूर झाल्याने औशाच्या पाणीचा



प्रश्न मिटणार आहे.

भविष्यातील औसा शहराचे होणारे विस्तारीकरण लक्षात घेऊन शहरातील वाढीव वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा करणारी वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर करवून घेण्यासाठी मागच्या काही महिन्यांपासून आमदार अभिमन्यू पवार सातत्यपूर्ण पाठपुरावा करत होते. प्रस्ताव दाखल केल्यानंतर त्यात काही तांत्रिक त्रुटी काढण्यात आल्या,यावर आ. अभिमन्यू पवार यांनी मुंबईत उपसचिव श्री आंडगेजी यांची भेट घेऊन चर्चा केली, त्यांचे व औसाचे मुख्याधिकारी यांचे फोनवर बोलणे करुन दिले आणि प्रस्तावात योग्य त्या सुधारणा करवून सुधारित प्रस्तावाचे ऑनलाईन सबमिशन करून घेतले. डीपीआर तयार झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू होता. २३ ऑक्टोबर रोजी सदरील योजनेला तांत्रिक मान्यता मिळाली तर १ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय तांत्रिक समितीची मान्यता मिळाली.इतर सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होवून लोकसभा आचारसंहिता लागू होण्यापूर्वी औसा शहर वाढीव वस्ती पाणीपुरवठा योजनेला मंजुरी मिळावी असा प्रयत्न होता.त्या प्रयत्नास यश मिळाले असून ४३ कोटी रुपयांच्या औसा शहर वाढीव वस्ती पाणीपुरवठा योजनेला अखेर मंजुरी मिळाली आहे.

२५ वर्षांपासूनची मागणी असलेली औसा शहराला माकणी धरणातून पाणीपुरवठा करणारी योजना आमदार अभिमन्यू पवार यांनी मंजूर करवून आणून प्रत्यक्षात कार्यान्वित केल्यानंतर शहरासाठी आणखीन एक ४३ कोटींची वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर केली आहे. आमदार पवार यांच्या पाठपुराव्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या औसा शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मिटणार आहे. औसा शहराला पाणी आणि रस्त्याची समस्या कधीच जाणवणार नाही यादृष्टीने आमदार अभिमन्यू पवार यांचे प्रयत्न सुरू आहेत.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## झरोका

एक – खबरदार महाराष्ट्र हे संताची, फुले, आंबेडकर, शाहू, आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची कर्मभूमी असली तरीही महाराष्ट्रावर मराठवाड्यानीच. सत्ता भोगली आहे आणि भोगणारच पण वाटा, पळवाटा काढून आम्हाला आमची सत्ता पाहिजे, मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण म्हणजे वड्यावरचे तेल वांग्यावर टाकता काय, ओबीसीतूनच मराठा कुणबी आरक्षण हवे आहे त्याशिवाय शांत बसणार नाही, घरात, तुरुंगात नसलो तरी चालेल पण न्यायासाठी लढणाराच मर्द मराठा आहे असे जरांगे पाटील यांनी ठणकावले आहे पण सामाजिक जातीय तणाव निर्माण होणारच असे दिसते मग सर्वसामान्याचे काय होईल हेच कळत नाही. डोकं सैराट बनले आहे.

दुसरा – अरे, तसे काहीच नाही, सरकार आणि जरंगे पाटील यांच्यात काहीतरी ठरलेच असावे म्हणून सरकार १०% म्हणते, जरंगे उपोषण माघारी घेतात आणि पुन्हा सरकारलाच तंबी देतात म्हणूनच लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काहीतरी उलथापालता करायची असेच ठरले असावे तू शांत बस.

एक – अहो, शांत बसून कसे जमेल, भाजपा विरोधी इंडिया आघाडीतून वंचित ने त्या जरंगेला जालना लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मागितली आहे मग ओबीसीचे काय हा प्रश्न भेडसावतो आहे.

दुसरा – अरे, ओबीसी–हे एकच आहेत केवळ अनुसूचित जातीचाच या सर्वांना तिरस्कार आहे त्यात बार्टी –आर्ट तयार आहेत मग कशाला काळजी करतोस,

एक – अहो, मी जरंगे पाटीलाची धमकी त्याचा अट्टाहास या विषयी बोलतो आहे रामायण–महाभारत कशाला सांगता हेच तुमची चाणक्यनीति आहे हेच कळत नाही.

दुसरा – अरे, राम कृष्ण–महादेवा तुला मी कोणती शपथ घेऊन सांगू की हे सारे आंदोलन–कर्ते –धर्ते–शासक–प्रशासक, लोकप्रतिनिधी हे एकच माळेचे मणी असतात, मतलबी असतात, उणे–दुणे काढतात पण ऐनवेळी एकच होतात. हे लोकसभा निवडणुकीतून कळेलच शांत बस.

## काय बोलता राव !

लोकसभा निवडणुका तोंडावर आले आहेत. सर्वच राजकीय पक्ष आपापली रणनीती आखात आहेत. प्रत्येक राजकीय पक्ष लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवाराची चाचणी करीत असताना लातूर महानगरपालिकेच्या तत्कालीन कॉँग्रेस भाजपच्या राजवटीतील मोठे–छोटे गुत्तेदारांनी लातूरच्या महानगरपालिकेत कोऱ्या निविदा साठी झुंबड उठविली असून तोंड बघूनच त्या निविदा देणे–स्वीकारणे उघडपणे सर्वात धंदा केंद्रे अभियंता मार्फत भाजपा–कॉँग्रेस वाले करीत असताना दिसत आहेत.

**काय बोलता राव,**

अरे, लोकसभा निवडणुका लागत्या, आहेत लातूर आज कॉँग्रेसची चलती होती पण आज घडीला कॉँग्रेस–भाजपा अशी जुळवाजुळवत असल्याने लातूर महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी मार्च अखेरीस हिशोब पुरता करणे, जमा रकमेची विल्हेवाट लावण्यासाठी छोट्या –मोठ्या गुत्तेदारांना खुश करून खिसा गरम करण्याच्या हेतूने माझा काही संबंध नाही मी प्रशासक आहे कार्यकारी अभियंता काय ते पाहून घेतील म्हणून केंद्रे यांनी लक्षात करून केंद्रे अभियंता मार्फत सर्व काही बिनभोबाट कार्यक्रम चालू आहे. लोकसभा निवडणूक झाली की पुन्हा कर्तबगार प्रशासक आणि पुन्हा आयुक्त म्हणून बाबासाहेब मनोहरे हेच राहणार त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कचे सुशोभीकरण घडविले हाच ह्यांची ओळख ठरावी एवढेच पण बोला दाजीबा.

## ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

मुंबई, : ऊसतोड कामगारांच्या मुलांचा




शिक्षण आणि आरोग्याचा प्रश्न अतिशय गंभीर आहे. याबाबत जिल्हा पातळीवर होणाऱ्या कार्यवाही संदर्भात तातडीने बैठक घेऊन आढावा घेण्याच्या सूचना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्या. आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी या समस्यांबाबत लवकरच आढावा घेणार असल्याचे सांगितले.

ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या साखरशाळा आणि आरोग्य याविषयी बुधवारी विधान परिषदेत पुरवण्या मागण्यांवर चर्चेदरम्यान सदस्य सुरेश धस यांनी प्रश्न उपस्थित केला होता. साखर कारखाना मालक साखर शाळांबाबत गंभीर नाहीत. त्यामुळे आपल्या पालकांबरोबर स्थलांतर करणारे विद्यार्थी शाळाबाह्य होतात. परिणामी भविष्यात ही मुले ऊसतोडीकडे वळतात. यामुळे या समस्या सोडविण्यासंदर्भात उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सूचना केल्या.

# तुझे माझे जमेना, तुझ्या वाचून करमेना!

## संपादकीय...

स्वातंत्र्य भारतातील राजकीय व्यवस्था हीच सामाजिक न्यायाला सोडून सत्ता केंद्रित बनलेली आहे. १९४७ च्या स्वातंत्र्याच्या केवळ सामाजिक न्याय, लोकशाही माध्यम आणि त्यातूनच सर्वकश सुविधाचे कार्यप्रवण करणे हे शासकीय–प्रशासकीय धोरण होते पण सत्तेसाठी वाटेल त्या उलाढाली करून खुर्ची हस्तगत करणारे आणि त्याच खुर्चीसाठी तरबेज ठरणारे विरोधी पक्षनेते ही कमी नसावेत असाच राजकीय वर्तुळाला व्होरा प्रकट होत असला तरी सर्वसामान्य जनतेत हे असे–कसे चालले आहे हेच कळेनासे झाल्याने, तुझे माझे जमेना –तुझ्याविना करमेना ही अवघड जागची कथा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे दाखवीत आहेत. त्यातच त्यांच्या अर्थात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विजयाला सुरुंग लागते की काय अशीच राजकीय वर्तुळात चर्चा होताना दिसते आहे ती नाकारता येत नाही. असे म्हटल्यास वावगे करू नये अशीच कुजबूज सर्वत्र होताना दिसते आहे.

स्वातंत्र्याचा इतिहास कोणीही कुणास सांगण्याची गरज नसताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे १५ ऑगस्ट १९४७ ऐवजी २०१४ चा उल्लेख करतात. आजही ते नेहमीच स्वातंत्र्य भारताला कॉँग्रेसने असे केले–तसे केले आणि मी असे करीत आहे, अशी बतावणी करताना न्यायिक योजना–प्रकल्प याचे नाव बदलून त्यावरच रेघोट्या ओढणे म्हणजे तो भारताचा विकास होऊ शकत नाही. जुने संसद भवन सोडून नवे संसद भवन बांधणे ही प्रगतीचे लक्षण ठरू शकत नाही कारण जनतेच्या पैशाचा गैरवापर हेच ठळक उदाहरण समोर येते, भारत सरकार किंवा राज्य सरकारे जे काही सोयी–सुविधा करतात, योजना राबवितात, करतात ते काही स्वतःच्या खिशातून नव्हे तर जनतेच्या जमा झालेल्या वसूल, महसुलातून होत असते, मग मी केले–त्यांनी केले नाही कोणाच्या बापाचे गेले हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर करावे अशी लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे.

कॉँग्रेसने भारत कंगाल केला, महागाई–भ्रष्टाचाराला वाव दिला असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणतात मग आज घडीला ज्वारीचा भाव काय आहे. सोन्याचा भाव काय आहे .ज्वारी खाणारे गरीबच असतात. सर्वपक्षीय नेत्याचे परिवार असतात पण मोदी ते खाऊ शकत नाहीत म्हणून ज्वारीचे भाववाढ ही व्यापाऱ्याची झोळी भरून गरिबांना, मोदी परिवाराला भिकेला लावण्याची व्यवस्था नसेल काय असा विषय चर्चेला जात असताना केवळ कॉँग्रेसला विरोध करून स्वतःचे पाप झाकून ठेवण्यात साठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे कॉँग्रेसलाच जबाबदार ठरवून कॉँग्रेसचाच लोकसभेच्या आयत्यावेळी प्रसार –प्रचार करीत असावेत काय अशीच उलट सुलट चर्चा होत असून तुझे माझे जमेना–तुझ्या वाचून करमेना अशीच दूर अवस्था नरेंद्रजी मोदी जी ची झाली असल्याची लोक प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे ती टाळता येण्यासारखी नसावी असे वाटते.

कॉँग्रेसच्या विरोधात बोलणे, त्यांच्या योजनेचे नाव बदलून नवीन नाव ठेवणे ती कार्यान्वित करणे, सत्ता बदलासाठी नको ती यंत्रणा वापरून लोकप्रतिनिधीना त्रास देऊन, खटले दाखल करून स्वार्थी राजकारण–सत्ता कारण करणे हेच मोदीजीचे एकमेव धोरण असून कॉँग्रेस नेते मोदी सरकारच्या धोरणावर टोला करीत असतानाही त्यास प्रत्युत्तर न देता केवळ कॉँग्रेसमुक्त भारत कॉँग्रेसनेच देशाचे वाटोळे केले, वगैरे वगैरे आरोप प्रधानमंत्री नरेंद्र मोदी करीत असतात पण जो काही–कसला –वसला जो–तो भारत कॉँग्रेसने टिकवून ठेवला आणि त्याच भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे सत्ताधारी बनले आहेत त्याचे आकलनच मोदीजींना होत नसेल तरी त्यांचा चुटा धरून बसलेल्या अमित शहा, राजनाथ सिंह,स्मृती इराणी यांनी त्यांना सावध का करू नये याबद्दलच उलट सुलट चर्चा होताना दिसते आहे ती टाळता येत नाही परंतु प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे कसलेच कोणतेही पर्याय नसल्याने ते कॉँग्रेसवर तुटून पडतात आणि कळत –नकळत कॉँग्रेसलाच प्रसिद्धी देत असून तुझे न माझे जमेना–तुझ्या वाचून करमेना हीच रूमनगाठ बांधली असल्याने माझे मरण मी पाहिले मज डोळ्याने कोणा विचारवंतान सांगितले होते तेच आजडीला पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्यांच्या पल्याडल्या इंद्रियातून पाहात असावेत एवढेच.

# जिल्ह्यात भटक्या विमुक्त जातीसाठी काम करणाऱ्या संस्थांनी केलेल्या सर्व्हेचा अहवाल प्रशासनाला द्यावा मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे

सोलापूर, (जिमाका) :– जिल्ह्यात भटक्या विमुक्त जातीसाठी काम करणाऱ्या संस्थांनी या जातीतील नागरिकांसाठी आवश्यक असलेले जन्म दाखले, आधार कार्ड, मतदान कार्ड, पेन्शन योजना आदीबाबतचा केलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल प्रशासनाला सादर करावा. तसेच या अहवालाप्रमाणे प्रशासनाने माहिती घेऊन या जातीतील नागरिकांना मतदान कार्डसह अन्य विविध दाखले देण्यासाठी विहित पद्धतीने कार्यवाही करावी, अशा सूचना राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी दिल्या.

भटके विमुक्त जाती करीता काम करणाऱ्या संस्थेच्या प्रतिनिधी शी नियोजन समिती सभागृह येथे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी चर्चा करून आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उप जिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, भटके विमुक्त जाती चे प्रतिनिधी बाळकृष्ण रेणके, सिद्राम पवार, युवराज जाधव, विजय शिंदे, मोतीराम चव्हाण, चंद्रकांत गडेकर, ड. निशांत परदेशी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी भटक्या विमुक्त जातीमधील विविध संस्थांच्या प्रतिनिधी यांच्याशी भटक्या जातीतील नागरिकांना विविध प्रकारचे दाखले मिळण्याच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा केली. जिल्हा प्रशासनही या जातीतील नागरिकांना मतदान कार्डसह अन्य दाखले देण्यासाठी विहित पद्धतीचा अवलंब करून प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. भटक्या विमुक्त जातीतील नागरिकांना मतदान कार्ड देण्यासाठी त्यांचे स्वयंघोषणापत्र आवश्यक असून ते स्वयंघोषणापत्र घेऊन प्रशासन संबंधित नागरिकांना मतदान कार्ड देणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. या जातीतील नागरिकांची स्थळ पाहणी करून त्यानंतर वृत्तपत्रात जाहीर प्रगटन करून एक महिन्यानंतर जन्माचा दाखला प्रशासन देणार आहे. तसेच या जातीतील ज्या नागरिकांकडे जातीचे प्रमाणपत्र असेल अशा नागरिकांच्या पाल्यांना त्वरित जातीचे प्रमाणपत्र देण्यात येईल. जातीचा दाखला मिळण्यासाठी पुढील आठ ते दहा दिवसात कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. भटक्या विमुक्त जातीचे प्रतिनिधी श्री बाळकृष्ण रेणके यांनी व अन्य उपस्थित प्रतिनिधींनी भटक्या विमुक्त जातीतील नागरिकांना आवश्यक असलेली विविध प्रमाणपत्रे, दाखले हे शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे त्वरित वितरित करावीत, अशी मागणी केली. कायद्याप्रमाणे काम करावे परंतु प्रशासनाने संवेदनशीलता ठेवून या सर्व जातीमधील लोकांना स्थळ पाहणी करून त्वरीत जातीचे दाखले वितरित करावेत अशी मागणी ही करण्यात आली.

निवडणूक प्रक्रियेतील सर्व अधिकारी–कर्मचारी यांनी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे

निवडणूक प्रशासनाने होम वोटिंगची प्रक्रिया सूक्ष्मपणे नियोजन करून यशस्वी करावी.

**ज्या मतदान केंद्रावर कमी मतदान झालेले आहे त्या केंद्रास आदर्श मतदान केंद्र म्हणून तयार करावे.**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ स्वीप ची प्रक्रिया अत्यंत प्रभावीपणे



अंतर्गत सोलापूर व माढा लोकसभा मतदार संघासाठी नियुक्त करण्यात आलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी व ही निवडणूक प्रक्रिया शांततामय व निर्भयपणे होईल यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी केले.

नियोजन भवन येथे आयोजित लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ पूर्व तयारी आढावा बैठकीत मुख्य निवडणूक अधिकारी श्री. देशपांडे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उप जिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्यासह सर्व सहायक निवडणूक अधिकारी, सर्व नोडल अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

मुख्य निवडणूक अधिकारी देशपांडे पुढे म्हणाले की, लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व सहाय्यक निवडणूक अधिकारी सर्व नोडल अधिकारी पोलीस अधिकारी यांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे गांभीर्यपूर्वक आपली जबाबदारी पार पाडावी. निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. स्ट्रॉंग रूमसह ईव्हीएम मशीन बाबत अत्यंत काळजीपूर्वक काम करावे. इतर जिल्ह्यातून दारू, पैसा व अन्य संबंधित बाबी आपल्या जिल्ह्यात येणार नाहीत यासाठी जिल्ह्याच्या सीमेवर चेक पोस्ट तयार करावेत. तसेच आंतर राज्य सीमेवर ही चेक पोस्ट तयार करून तिथे निवडणूक पथके नियुक्त करावेत असेही त्यांनी सूचित केले.

भारत निवडणूक आयोगाने या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर होम वोटिंग हा पर्याय ८० वर्षपेक्षा अधिक वय असलेले मतदार तसेच दिव्यांग मतदारासाठी उपलब्ध करून दिलेला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात जवळपास सव्वा लाख ८० वर्षे वय असलेले व दिव्यांग मतदार आहेत. निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यानंतर तात्काळ डी–१२ चा फॉर्म या मतदारापर्यंत पोहोचवून त्यांच्याकडून घरातून मतदान करणार की मतदान केंद्रावर जाऊन मतदान करणार याची माहिती भरून घ्यावी. घरून मतदान करण्यासाठीची प्रक्रिया व त्यासाठी आवश्यक असलेला पोलिंग स्टाफ यांची नियुक्ती करावी व त्यांना निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे प्रशिक्षण द्यावे असे निर्देशही मुख्य निवडणूक अधिकारी श्री. देशपांडे यांनी दिले.

लोकशाहीच्या या उत्सावात जास्तीत जास्त मतदारांनी सहभाग घ्यावा यासाठी राबवावी व जास्तीत जास्त प्रमाणात मतदाराची नोंदणी करून मतदारांनी मतदान प्रक्रियेत उत्साहाने सहभागी व्हावे यासाठी त्यांचे प्रबोधन करावे. प्रत्येक मतदान केंद्रावर निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे आवश्यक असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर दिव्यांगासाठी रॅम्प, त्याचबरोबर महिला व पुरुष मतदारांसाठी स्वतंत्र शौचालयाच्या सुविधा आहेत की नाहीत याची पुन्हा एकदा व्यवस्थित खात्री करून घ्यावी, असे निर्देश श्री. देशपांडे यांनी दिले. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा प्रशासाच्यावतीने लोकसभा निवडणुकीच्या तयारीची माहिती दिली. जिल्ह्यात लोकसभेचे ४२– सोलापूर (अनुसूचित जातीसाठी राखीव) व ४३ –माढा असे दोन मतदार संघ आहेत. जिल्ह्यात ११ विधानसभा मतदारसंघ असून ३ हजार ५९९ मतदान केंद्र आहेत. यातील नागरी भागात १ हजार २४३ तर ग्रामीण २ हजार ३५६ मतदान केंद्र आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार ४३ लाख १७ हजार ७५६ तर २०२४ मध्ये अंदाजे लोकसंख्या ४७ लाख २६ हजार १४३ इतकी आहे. सोलापूर जिल्ह्याची सीमा राज्यातील सात जिल्ह्याला लागून असून, अंतर राज्य सीमा कर्नाटक राज्यातील कलबुर्गी आणि विजयपूर जिल्ह्याला लागून आहे. तर मागील लोकसभा निवडणुकीत ६१.२८ टक्के मतदान झालेले होते, अशी माहिती त्यांनी दिली. सोलापूर जिल्ह्याची २७ फेब्रुवारी २०२४ अखेर मतदार संख्या ३६ लाख ७ हजार ५३१ इतकी असून, त्यातील पुरुष मतदार १८ लाख ६७ हजार १३८ तर महिला मतदार १७ लाख ४० हजार १०९ इतके आहेत. तृतीयपंथी मतदार संख्या २८४, परदेशात गेलेले मतदार ५४, दिव्यांग मतदार २७ हजार ०४ व ८० वर्षपेक्षा अधिक वय असलेले मतदार १ लाख ६ हजार १३९ तर १०० वय वर्ष पेक्षा अधिकचे मतदार ३ हजार २३, सर्विस मतदार ४ हजार ६१६ इतके आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. त्याप्रमाणेच निवडणुकीसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्धता, नवीन मतदार नोंदणीसाठी केलेले प्रयत्न, मतदार यादीतील मतदारांची नावे वगळणे याबाबत केलेली कार्यवाही, स्ट्रॉंग रूम, ईव्हीएम मशीन, आदर्श मतदान केंद्र, मतदानासाठी नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण हे अनुषंगाने सविस्तर माहिती त्यांनी दिली. यावेळी नागरी व ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर व एकूण निवडणूक प्रक्रियेत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस बंदोबस्ताच्या अनुषंगाने पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार व पोलीस अधीक्षक सरदेशपांडे यांनी माहिती दिली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने नियुक्त केलेले नोडल अधिकारी व विविध समित्यांची यावेळी माहिती दिली.

# रविचंद्रन आश्विनचे विक्रमी ५०० बळी

भारताचा ऑफ स्पिनर रविचंद्रन अश्विन याने इंग्लंड विरुद्धच्या राजकोट कसोटीत ५०० बळींचा टप्पा गाठत विक्रमी कामगिरी केली. कसोटी क्रिकेटमध्ये पाचशे बळी घेणारे मोजकेच गोलंदाज आहेत त्यात आता आश्विनचा समावेश झाला आहे. भारताच्या दृष्टीने पाहायला गेले तरी कसोटीत पाचशे बळी मिळवणारा तो भारताचा दुसराच गोलंदाज आहे. या आधी अशी कामगिरी भारताचा महान लेगस्पिनर अनिल कुंबळे यालाच करता आली आहे. म्हणजे त्याच्यापुढे आता फक्त अनिल कुंबळे आहे. अनिल कुंबळे याने ६०० च्या वर बळी घेतले आहेत याचाच अर्थ दोघांमध्ये आता फक्त १०० बळींचे अंतर आहे.

आश्विन आता ३७ वर्षाचा आहे. त्याचा फॉर्म आणि फिटनेस उत्तम आहे त्यामुळे तो आणखी दोन अडीच वर्ष सहज खेळू शकतो. तो जर आणखी दोन अडीच वर्ष खेळला तर अनिल कुंबलेला मागे टाकून भारताकडून सर्वाधिक बळी मिळवणारा गोलंदाज ठरू शकतो. आज आश्विन हा जगातील सर्वाधिक धोकेदायक गोलंदाज समजला जातो विशेषतः भारतीय खेळपट्ट्यांवर तर तो अधिक धोकेदायक ठरतो. त्याने मिळवलेल्या ५०० बळीपैकी ३५० हून अधिक बळी त्याने भारतात घेतल्या आहेत. परदेशातही त्याची कामगिरी चांगली आहे. परदेशातही त्याने बळी मिळवलेले आहेत. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया यासारख्या प्रबळ संघाविरुद्ध त्याने सातत्याने चांगली गोलंदाजी केली आहे. त्याने केवळ गोलंदाज म्हणून नाही तर फलंदाज म्हणूनही चांगली कामगिरी केली आहे.

कसोटीत त्याने पाच शतके झळकावली आहेत. कसोटीत पाच शतके झळकवणे ते ही सातव्या, आठव्या क्रमांकावर येऊन ही साधी गोष्ट नाही. कसोटीत ५०० बळी आणि ५ शतक झळकावणारा तो एकमेव खेळाडू आहे. अशी कामगिरी एक चांगला अष्टपैलू खेळाडूच करू शकतो. आश्विनने हे करून आपण केवळ गोलंदाज नसून अष्टपैलू खेळाडू आहोत हे सिद्ध केले आहे. आश्विनने केवळ कसोटीतच नाही तर एकदिवसीय आणि टी २० सामन्यात ही चमकदार कामगिरी केली आहे. एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही त्याने खूप बळी मिळवले आहे. कसोटी प्रमाणेच एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही त्याने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. आश्विन हा भारताचा खराखुरा मॅच विनर खेळाडू आहे. २०११ साली जेंव्हा त्याने भारताकडून कसोटीत पदार्पण केले तेंव्हा अनिल कुंबळे निवृत्त झाला होता तर हरभजन सिंगचा उतरता काळ सुरू झाला होता.

या दोघांनी जवळपास दीड दशके भारतीय फिरकी गोलंदाजीची धुरा सांभाळली होती त्यांच्या नंतर भारतीय फिरकीची धुरा कोण सांभाळणार हा प्रश्न होता कारण त्यावेळी त्यांची जागा घेणारा तर सोडाच पण त्यांच्या जवळपास जाऊ शकणारा एकही फिरकी गोलंदाज दिसत नाही. आश्विन ज्यावेळी आला त्यावेळीही तो इतकी मोठी मजल मारेल असे भाकीत कोणी केले नव्हते मात्र त्याने मिळालेल्या संधीचे सोने केले त्यामुळेच तो आज महान गोलंदाजांच्या पंगतीत बसला आहे. रविचंद्रन आश्विनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यापूर्वी देशांतर्गत क्रिकेट ही गाजवून सोडले होते. त्याने रणजी सामन्यात सातत्याने बळी मिळवले मात्र त्याला खरी ओळख मिळवून दिले ती आयपीएलने. आयपीएलमध्ये आश्विनने चेन्नई सुपरकिंग्ज संघाचे प्रतिनिधित्व केले.

मुथय्या मुरलीधरन हा चेन्नई सुपरकिंग्जचा प्रमुख फिरकी गोलंदाज होता. कर्णधार महेंद्रसिंग धोनीला गोलंदाजीची सुरुवात फिरकीने करायची होती मात्र मुरलीधरन सुरुवातीलाच गोलंदाजी करण्यास तयार नसल्याने धोनीने चेंडू आश्विनकडे सोपवला. आश्विनने या संधीचे सोने करीत प्रतिस्पर्धी संघाची सलामीची फळी कापून काढण्याची कामगिरी केली तिथेच धोनीचा आश्विनवर विश्वास बसला. आयपीएलमध्ये सातत्याने चांगली कामगिरी केल्याने धोनीने त्याला भारताकडून खेळायची संधी दिली. आश्विनने धोनीने टाकलेला विश्वास सार्थ ठरवला.

मागील १३ वर्षात त्याने भारताला अनेक अविश्वसनीय विजय मिळवून दिले आहेत आता त्याने भारताला जागतिक कसोटी अजिंक्यपद मिळवून द्यावे हीच त्याच्याकडून क्रिकेट प्रेमींनी अपेक्षा आहे. ५०० बळींचा टप्पा पार करणाऱ्या रविचंद्रन आश्विनचे मनापासून अभिनंदन!!!

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुण,९९२२५४६२९५**

# ॲड. रूद्राली पाटील – चाकूरकर यांचा विवाह थाटात संपन्न

लातूर /प्रतिनिधी– देशाचे माजी गृहमंत्री, लोकसभा अध्यक्ष व पंजाबचे राज्यपाल श्री. शिवराज पाटील चाकूरकरांची आणि डॉ. अर्चना पाटील व श्री. शैलेश पाटील यांची ज्येष्ठ कन्या ॲडव्होकेट रूद्राली पाटील यांचा विवाह मध्य प्रदेशातील इंदोरचे जिल्हाधिकारी आयएएस श्री.मनीष सिंह यांचे सुपत्र कुशाग्र सिंह यांचा विवाह २५ फेब्रुवारी २०२४ रोजी राजस्थान मधील अल्वर जिल्हातील तिजारा फोर्ट येथे मोजके पाहुणे व मित्रांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायधीश श्री. शिवराज पाटील (बेंगलोर ) मा. श्री. गुलामनबी आजाद, केंद्रीय मंत्री श्री. भगवंत खुब्बा, राजस्थानचे गृहमंत्री, माजी मंत्री श्री. बसवराज पाटील, श्री. प्रदीप राठी, प्रा. श्री. बी. व्ही. मोतीपवळे, श्री. राजेश्वर बुके इत्यादी मोजके मान्यवर व नातेवाईक उपस्थित होते.



यानंतर भोपाळ येथे स्वागत समारोह २७ फेब्रुवारी रोजी झाला. या स्वागत समारोहास मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री मोहन यादव, माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान, मध्यप्रदेशचे मुख्य सचिव इकबाल सिंह इत्यादी आणि अनेक आयएस व आयपीएस अधिकारी उपस्थित होते. भोपाळ येथे स्वागतसमारोहाचेवेळी मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. गाडी पार्क करून जवळपास एक किलोमीटर अंतर चालून जावे लागत होते. अशी स्थिती होती.

**सकस आहार ..**

आश्रमशाळेत बुवा
देतो आहार सकस
माहीत नाही कसले
काय लावले निकष
चतुरस्त्रपौष्टीकघास
देतो म्हणाला सरस
थाळीत विजोडअन्न
सगळा झाला निरस
स्वस्तात मस्त थाळी
असते भलते साहस
जमाखर्च ताळेबंदात
असते थरारकसर्कस
बीले सगळी प्रलंबित
कळेना काय आकस
कट देऊ किती कुणा
अधिकारीनेते नर्व्हस
तक्रार ऐकाया बहिरे
कसे करायचे धाडस
हिशेब तपासे आंधळे
काय करणारं पाडस
ऐकावे तितुके नवल
कहाण्या समग्र सुरस
धान्य गोदामे रिकामी
तुडुंब भरला सोमरस
समदुःखी एकसमान
गायला लागा कोरस
देणार आहार सकस
ढकलला जाई दिवस

**२)**

**मधमाशी ..**

अहो रात्र कार्यरत
मधसंचे मधमाशी
नेतात चोरून मध
टपून बसे अधाशी
आश्वस्ततिकीटाचे
पाडतात तोंडघशी
पितळेपुढे रे फिके
सुवर्ण बावनकशी
अग्रभागी फोटोला
जो करी मखलाशी
नजर आम्हां वरती
बसून राहे पायाशी
साक्षीदार उगा बने
करता ते अय्याशी
कमवी सुवर्ण राशी
दिसला जो उशाशी
हाड होवून राहिलो
जेवण येते घशाशी
इमान असे मिठाशी
म्हणे खावे कशाशी
स्वताचेचंनातेवाईक
कवटाळे का उराशी
फेले जातो शेवटाले
चूक दिसता जराशी
श्रेष्ठीचे विचार बदले
लागे कुणी कानाशी
पुन्हा पुढे येईल संधी
समजूतघाले मनाशी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

## रासेयो शिबिरातून सामाजिक बांधिलकी वृद्धिंगत होते- प्रा. डॉ. रणजीत जाधव



बाभळगाव : राष्ट्रीय सेवा योजना देशपातळीवर युवकांचे संघटन आहे. विशेष युवक शिबिरातून युवकांमध्ये लोकशाही मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखला जातो. आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्याची क्षमता आणि सामाजिक बांधिलकी अशा शिबिरातून वृद्धिगत होते. असे प्रतिपादन डॉ. रणजीत जाधव यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव आणि ग्रामपंचायत मौजे धनेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास या शीर्षकाखाली सात दिवसांच्या विशेष युवक शिबिराच्या समारोपप्रसंगी डॉ. रणजीत जाधव प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे हे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. दशरथ भिसे यांनी केले तर डॉ. अगंद कोते, डॉ जयदेवी पवार, डॉ. पांडुरंग मुंढे यांची विशेष उपस्थिती यावेळी होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओंकार सुरवसे श्रयांनी व आभार प्रणिता शेंडगे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ठसका**

कुणाला विरप्पन दिसतो तर
कुणाला साईबाबा दिसतो
कुणाला सद्गुरू दिसतो तर
कुणाला त्यांचा बाबा दिसतो
गोदी मीडियाला त्यात बघा
न जाणे काय काय दिसते
वरवरचा मोठेपणा पाहून
सारं जग बार बार फसते
अंधभक्त कधी कधी न जाणे
कोणाला काय उपमा देतील
स्वतः च्या पायावर धोंडा मारून
देशाला अधोगती कडे नेतील

**– विजय वाठोरे, नांदेड**
**९९७५५९३३५९**

# दयानंद विज्ञान महाविद्यालयात राज्यस्तरीय हॅकेथॉन कोड-टेक कोडिंग स्पर्धा

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात विज्ञान दिनाचे औचित्य साधून दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी लायन्स क्लब,लातूर,संगणकशास्त्र विभाग आणि इन्स्टिट्यूटशन इनोव्हेशन कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय हॅकेथॉन कोड टेक– २०२४ कोडिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.या स्पर्धेच्या उद्घाटनाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,आयक्यूएसी समन्वयक, उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे आणि आयआयसी कन्व्हेनर डॉ.श्रेयस माहुरकर,लायन्स क्लबचे अध्यक्ष अशोक पांचाळ,लायन्स क्लबचे माजी प्रांतप्राल डॉ.मन्मथ भातांब्रे आणि लायन्स क्लबचे संचालक सुधाकर जोशी उपस्थित होते.

सदरील राज्यस्तरीय हॅकेथॉन कोड–टेक–२०२४ कोडिंग स्पर्धेत उदगीरच्या मातृभूमी विद्यालयाची इंद्रायणी सतीश पाटील बीसीए द्वितीय वर्षातील विद्यार्थीनीने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले तर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या बी.एस्सी.द्वितीय वर्षातील विद्यार्थी विश्वजीत तानाजी नातू यांने पटकाविले,तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक,पीसीसी लातूरची ऋतुजा संतोषराव दीक्षितने पटकाविले.या स्पर्धेत २८३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.बक्षिस वितरणासाठी डॉ.विकास हुंबे तसेच डॉ.रोहिणी लाटे,एम.एस. बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज,लातूर हे उपस्थित होते.प्रमुख मान्यवरांच्या हस्ते हस्ते बक्षिस वितरणाचा कार्यक्रम झाला.सदरील स्पर्धे तील प्रथम पारितोषिक ११००० रोख रक्कम आणि मानचिन्ह व प्रमाणपत्र,द्वितीय पारितोषिक ७००० रोख रक्कम मानचिन्ह व प्रमाणपत्र,तृतीय पारितोषिक ५००० रोख रक्कम मानचिन्ह व प्रमाणपत्र आणि ५ उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आली.त्यात प्रथम रनर–अप पुनम सुनील कुलकर्णी मातृभूमी महाविद्यालय,उदगीर,१५०० रोख पारितोषिक,ट्रॉफी, प्रमाणपत्र,द्वितीय रनर अप ऋतुजा हरिभाऊ पवार बी.एस्सी.(सीएस) तृतीय वर्ष कॉकसिट कॉलेज,लातूर,१००० रोख पारितोषिक, ट्रॉफी,



प्रमाणपत्र,तृतीय रनर अप पुनम बलिराम गीते एमबीईएस कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग,अंबाजोगाई १००० रोख पारितोषिक, ट्रॉफी, प्रमाणपत्र, चतुर्थ रनर अप रामेश्वर राजेंद्र कुंभार बीसीएस तृतीय वर्ष दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर ५०० रोख पारितोषिक, ट्रॉफी, प्रमाणपत्र,पाचवा रनर अप आफरीन शेख बी.एस्सी.सी.एस.द्वितीय वर्ष पीसीसी लातूर,५०० रोख पारितोषिक, ट्रॉफी,प्रमाणपत्र देण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विज्ञान दिनाचे महत्त्व आणि नोबल पारितोषिक विजेते सी.व्ही.रमण यांच्या कार्याचा गौरव करून विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श समोर ठेवून संशोधन करून देशाचे नाव उज्वल करावे असे ते म्हणाले,तर डॉ.मन्मथ भातांब्रे यांनी यावेळी आई–वडील व गुरुजनांचे जीवनात महत्त्व विशद करून देवापेक्षाही गुरुचे स्थान अढळ आहे,असे प्रतिपादन केले.तसेच सुधाकर जोशी यांनी विद्यार्थ्यांना अथक परिश्रमाशिवाय पर्याय नाही असा संदेश दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लायन्स क्लबचे अध्यक्ष अशोक पांचाळ यांनी केले तर आभार संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे यांनी मानले.सूत्रसंचालन सरोजा जाधव आणि दुर्गा जाधव यांनी संयुक्तरित्या केले.यावेळी संगणकशास्त्र विभागाचे प्रा.सुजाता काळे,प्रा.वैभव कुलकर्णी, प्रा.सुमित जोशी,प्रा.दाडगे दीपाली,प्रा.अरुणा चौधरी,प्रा.विजय पवार,प्रा.शाझिया फरहीन,प्रा.पूजा नंदगावे, प्रियंका हिप्परकर, छाया केसाळे,राहुल बनभेरू शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी,संगणकशास्त्र फोरममधील भोसले प्रतीक्षा,पोतदार भक्ती,दायमा अनुराग,यश कटके,जाधव अनुपमा,दीक्षित शामकुमार,वाघमारे स्नेहा,मोरताले पवन,सूर्यवंशी शुभम,शिंदे गायत्री,साळुंके पवन,साकोले वैष्णवी,उफाडे गणेश,साकोले वैशाली, तांबारे अनुष्का हे सर्व पदाधिकारी आणि लातूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# ग्राम-शहर विकासासाठी युवकांचा ध्यास महत्वाचा जेष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे

लातूर : आज ग्राम–शहर विकासासाठी युवकांचा ध्यास महत्वाचा आहे तरच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय विकास साधला जाईल असे प्रतिपादन जेष्ठ विचारवंत तथा इतिहास तज्ञ प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सलग्नित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि ग्रामपंचायत कार्यालय, जवळा बु. यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक विशेष युवक शिबिर मौजे जवळा बु. येथे आयोजित करण्यात आले होते त्याच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपिठावर उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. मन्मथ भातांब्रे, प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, सरपंच चनबस भुजबळ, उपसरपंच मनोज कापरे, शालेय समितीचे अध्यक्ष गजानन पाटील, तंटामुक्तीचे अध्यक्ष चलबस डाळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके, डॉ. टी घन: श्याम, डॉ. अभयकुमार धाराशिवे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, रत्नेश्वर स्वामी, यशपाल ढोरमारे यांची उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेला सर्व मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले पुढे बोलताना प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे म्हणाले की, देशाला ध्येयवादी अथक परिश्रम करणारे आणि स्वतःवर विश्वास असणारे जिद्दी व चिकाटी तरुणाची नितांत आवश्यकता आहे. व्यक्तीचा विकास साधत साधत ग्रामीण भागाचा विकास करावयाचा असल्यास कष्ट, मेहनत, चिकाटी, जुळून घेण्याची वृत्ती, चारित्र्य, नम्रता, माणुसकी या गुणांचा समुच्चय असणारा तरुण वर्ग अधिक सक्रिय झाल्यास देशाचे भविष्य उज्वल आहे असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना डॉ. मन्मथ भातांब्रे म्हणाले की, महात्मा गांधीजींचा सेवाभाव आणि त्यांची रचनात्मक कार्यक्रमाची आठवण राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्यावेळी होते. समताधिष्ठित समाजरचनेचे संविधानात्मक उद्दिष्ट प्राप्त करायचे असल्यास गावागावात जातीय सलोखा निर्माण होऊन गावाचा रचनात्मक विकास व्हायला हवा हाच सेवा हाच धर्म असतो.

याप्रसंगी बोलताना डॉ. दुष्यंत कटारे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही समाजसेवी युवकांची चळवळ आहे. राष्ट्रीय सेवा योजनेतून परिपक्व सुजान नागरिक तयार होतो. सामाजिकतेचे भान शिबिरातून आल्यामुळे ग्रामविकासासाठी हजारो हात जोडले जातात. देशभरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून उत्तुंग असे कार्य झाले आहे उद्याचे भविष्य देखील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या हाती आहे असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके आणि कु. ऋतुजा भिसे हिने केले तर आभार डॉ. मनोहर चपळे यांनी मानले.

या उद्घाटन समारंभाला ग्रामस्थ आणि शिबिरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी जगन्नाथ येचेवाड, संतोष येचेवाद, योगेश मोदी परिश्रम घेत आहे.

# अमेरिका-महाराष्ट्र शैक्षणिक व संशोधन सहकार्य वाढवणार

मुंबई, : महाराष्ट्राचे राज्यपाल आणि राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांचे कुलपती रमेश बैस यांनी आज अमेरिकेतील विद्यापीठांना महाराष्ट्रातील विद्यापीठांसोबत शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात सहकार्य वाढविण्याचे आवाहन केले. त्या शिवाय विद्यार्थी, शिक्षक तसेच सत्रांची देवाण घेवाण व ऑनलाईन पद्धतीने क्रेडीट हस्तांतरण करण्याबाबत विचार करण्याचे आवाहन केले. अमेरिकेतील १४ विद्यापीठांचे प्रमुख आणि राज्यातील निवडक पारंपरिक विद्यापीठांच्या कुलगुरूंची संयुक्त बैठक आज राज्यपाल बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन येथे झाली, त्यावेळी ते बोलत होते. अमेरिका व राज्यातील विद्यापीठांमधील शैक्षणिक आणि संशोधन सहकार्याला चालना देण्यासाठी इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल एजुकेशन या संस्थेच्या पुढाकाराने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला अमेरिकेचे मुंबईतील वाणिज्य दूत माईक हॅन्की, शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, अमेरिकेच्या पब्लिक डिप्लोमसी अधिकारी सीता रायटर, इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशन (खखए) चे अध्यक्ष विवेक मनसुखानी, सह–अध्यक्ष जेसन सिझ आदी उपस्थित होते. आगामी शैक्षणिक सत्रापासून राज्यात नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू केले जाणार असून हे धोरण उच्च शिक्षण प्रणालीच्या आंतरराष्ट्रीयीकरणाला चालना देणारे आहे, असे राज्यपाल श्री. बैस यांनी सांगितले. या धोरणानुसार अधिकाधिक परदेशी विद्यार्थ्यांना आपल्या विद्यापीठांमध्ये आकर्षित करणे व देशातच शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाचे उद्दिष्ट साध्य करणे अभिप्रेत असल्याचे राज्यपालांनी सांगितले. हे धोरण परस्पर क्रेडिट मान्यता आणि हस्तांतर, परदेशी विद्यापीठांना भारतात विद्यापीठ परिसर स्थापन करणे तसेच देशांतील विद्यापीठांना विदेशात कॅम्पस उघडण्यास प्रोत्साहन देते असे राज्यपालांनी सांगितले. उच्च शिक्षणातील सकल विद्यार्थी नोंदणी सध्याच्या २६ टक्क्यांवरून २०३५ पर्यंत ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, असे नमूद करून महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थती आणि लोकांची विविधता लक्षात घेता, दूरस्थ आणि मुक्त शिक्षण हा सहकार्यासाठी सर्वोत्तम पर्याय असेल, असे राज्यपालांनी सांगितले.

कौशल्य क्षेत्रात अमेरिकेतील विद्यापीठांकडून सहकार्य मिळाल्यास त्याचे स्वागतच होईल असे सांगून भारतातील बहुसंख्य तरुणांना अमेरिकेतील विद्यापीठांकडून कौशल्य प्रशिक्षण, कौशल्य वर्धन आणि पुनर्कौशल्य ग्रहण क्षेत्रात संधी मिळाल्यास आनंद होईल असे राज्यपालांनी सांगितले.

पूर्वी भारतात उत्कृष्ठ उच्च शिक्षण व्यवस्था होती व अनेक नामांकित विद्यापीठे होती. भारत वेद, उपनिषद, योग, न्यायशास्त्र आणि इतर अनेक विषयांच्या प्राचीन ज्ञानाचे भांडार असून विद्यापीठ स्तरावरील सहकार्यामुळे अमेरिकेतील विद्यापीठांना भारताकडून प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, योग, आयुर्वेद, ज्योतिष, खगोलशास्त्र, वैदिक गणित इत्यादी क्षेत्रांमध्ये सखोल अध्ययनाची संधी मिळेल असे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी बोलताना अमेरिकन शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांना व्यावसायिक कार्य अनुभवासह अनेक गुणात्मक लाभ देत असल्याचे अमेरिकेचे मुंबईतील वाणिज्य दूत माईक हॅन्की यांनी सांगितले.

आज २.७ लाख भारतीय विद्यार्थी अमेरिकेतील विविध विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेत असून एकट्या मुंबई दूतावासाने ९०,००० विद्यार्थी व्हिसा जारी केले असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिकाधिक अमेरिकन विद्यार्थी महाराष्ट्रात उच्च शिक्षणासाठी आले तर आपल्याला आनंदच होईल, असे हॅन्की यांनी सांगितले.

बैठकीला सलमा घानेम, प्रोव्होस्ट, डीपॉल युनिव्हर्सिटी, स्टेफनी डॉशर, फ्लोरिडा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, रंजन मुखर्जी, मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटी, जेनी अकुने, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया बर्कले, राजीव मोहन, युनिव्हर्सिटी ऑफ ह्यूस्टन, मलिसा ली, कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी, जेफ्री सिम्पसन, ओक्लाहोमा स्टेट युनिव्हर्सिटी, वेंडी लिन–कुक, मॉन्टक्लेअर स्टेट युनिव्हर्सिटी, मोहिनी मुखर्जी, रटगर्स युनिव्हर्सिटी, जीत जोशी, कॅलिफोर्निया स्टेट युनिव्हर्सिटी हे उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर, (जिमाका): जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी नितीनकुमार वाघमारे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश १ मार्च, २०२४ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १५ मार्च, २०२४ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश धार्मिक सभा, अंत्ययात्रा, विवाह, अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## टपाल विभागाच्या महिला सन्मान बचतपत्र, सुकन्या समृद्धी योजनेबाबत होणार जनजागृती

लातूर, (जिमाका): जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून केंद्र सरकारने महिला सशक्तीकरण अंतर्गत आणि महिलांचा गुंतवणूकीत सहभाग वाढविण्यासाठी 'महिला सन्मान बचत पत्र' (व्याजदर ७.५० टक्के) नवीन बचत योजना सर्व पोस्ट ऑफिसमार्फत सुरु केली आहे. तसेच मुलींचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी 'सुकन्या समृध्दी योजना' (व्याजदर ८.२० टक्के) सुरु केली आहे. या दोन्ही योजनांची जनजागृती करण्यासाठी अधीक्षक डाकघर धाराशिव विभाग, मुख्यालय लातूर यांच्याकडून १ ते ८ मार्च, २०२४ या कालावधीमध्ये संपूर्ण लातूर जिल्हातंर्गत सर्व पोस्ट ऑफिसमध्ये विशेष जनजागृती अभियान सुरु करण्यात आले आहे.

लातूर जिल्ह्यातील प्रत्येक गावात वेळापत्रक बनवून जनजागृती मेळावे आयोजित केले आहेत. अभियानांतर्गत संपूर्ण योजनेची माहिती देणे, घरोघरी पोस्ट ऑफिस योजना पोहोचविणे, पात्र लाभार्थी यांचे तात्कार नवीन खाते उघडणे इत्यादी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. लातूर जिल्ह्यातील सर्व महिलांनी या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन धाराशिव विभाग, मुख्यालय लातूरचे अधीक्षक संजय अंबेकर यांनी केले आहे.

## भयमुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जावे शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग यांचे आवाहन

लातूर, – उज्वल भारत निर्माण करण्यासाठी व नापासांचा



शिक्का पुसून टाकण्यासाठी विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जाऊन यश संपादन करावे, असे आवाहन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे लातूर विभागीय अध्यक्ष सुधाकर तेलंग यांनी केले आहे.

येथील शिक्षण मंडळाच्या कार्यालयात तेलंग यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित छोटेखानी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते सुधाकर तेलंग व त्यांच्या पत्नी उषा तेलंग यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य गणपत मुंडे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, मंडळाचे सहसचिव अंकुश कुंभार, शिक्षण उपसंचालक कार्यालयातील लेखाधिकारी मारुती गुट्टे, वरिष्ठ अधीक्षक ए. पी. चवरे, एन. एन. डुकरे, देशपांडे, जी. आर. बिदरकर, लिपिक शंकर राठोड, उल्हास येळंबकर आदी उपस्थित होते.

यावेळी इयत्ता बारावी व दहावीच्या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर लातूर मंडळाचे अध्यक्ष व कोल्हापूर विभागाचे प्रभारी अध्यक्ष असलेले तेलंग यांनी सहा जिल्ह्यांतील परीक्षा केंद्र प्रमुखांशी सुमारे अडीच तास संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन केले. यावेळी तेलंग म्हणाले, विद्यार्थी नापास होणार नाहीत, यासाठी मंडळांच्यावतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात जमावबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत. या वर्षीपासून परीक्षा केंद्रात पाणीवाला बंदचा निर्णय घेण्यात आला असून विद्यार्थ्यांनी परीक्षेला येताना घरून पाण्याची पारदर्शक बॉटल आणावी. भरारी पथकांना ओळखपत्र बंधनकारक करण्यात आले आहेत. इंग्रजी व मराठी माध्यमांच्या विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेच्या कव्हरचा रंग वेगळा करण्यात आला आहे. मंडळातील नांदेड जिल्ह्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र परिसरात ड्रोनचा वापर करण्यात येत आहे. परीक्षा केंद्रात चित्रीकरण करण्यास मज्ज्ञाव करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नापासांचा शिक्का पुसून टाकण्यासाठी कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन करून त्यांनी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# ग्रीन लातूर वृक्ष टीम तर्फे वृक्ष संवर्धन कार्य.



लातूर : ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या माध्यमातून मागील पाच वर्षापासून लातूर जिल्ह्यामध्ये सर्वत्र मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. वृक्ष लागवडी सोबतच वृक्ष संवर्धनाचे महत्त्व जाणून लावलेल्या सगळ्या झाडांना आळीपाळीने टँकरद्वारे पाणी देऊन ती झाडे जगविण्याचे कार्य केले जात आहे.

आज ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या सदस्यांनी बार्शी रस्त्यावरील जिल्हा परिषद कार्यालयापासून ते संविधान चौक ते एक नंबर चौक ते शहीद भगतसिंग चौक ते बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज ते रेल्वे उड्डाणपुल परिसरातील सर्व झाडांना नऊ टँकर द्वारे भरपूर पाणी पाजून आपले कार्य संपन्न केले. आजचा १७३५ व्या दिवसाचा उपक्रम पूर्ण करण्यासाठी ग्रीन लातूर वृक्ष टीमचे डॉ. पवन लड्डा, पद्माकर बागल, मनिषा कोकणे, दयाराम सुडे, सिताराम कंजे, नागशेन कांबळे, प्रवीण भराटे, रवी तोंडारे, ओंकार सदरे, बालाजी उमरदंड, चाटे सर, बाळासाहेब बावणे, आकाश चिल्लरगे, सोमनाथ चिल्लरगे यांनी अथक परिश्रम घेतले.

यानिमित्ताने ग्रीन लातूर वृक्ष टीमने एक पत्रक काढून उन्हाळ्याच्या तीन महिन्यांमध्ये प्रत्येक लातूरकरांनी आपल्या परिसरातील दोन–चार झाडे दत्तक घेऊन त्यां झाडांना पाणी देण्याचे कार्य करावे असे आव्हान ग्रीन लातूर वृक्ष टीम सदस्यांनी केले आहे. या आव्हानास उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे असे पद्माकर बागल यांनी सांगितले.

### देवणी येथे ४ मार्च रोजी जिल्हास्तरीय पशुप्रदर्शनाचे आयोजन

लातूर, (जिमाका): जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत देवणी येथे सोमवार, ४ मार्च २०२४ रोजी जिल्हास्तरीय पशुप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनासाठी पशुधन व कुक्कुट गटांची नोंदणी ४ मार्च रोजी प्रदर्शनस्थळी सकाळी ११ नंतर केली जाणार आहे. तसेच सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंतचा वेळ पशुधन निवडीसाठी राखीव असल्याचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी कळविले आहे.

पशुसंवर्धनामध्ये सहभागी होण्यासाठी पशुधनाचे लंपी चर्मरोगाचे रोगप्रतिबंधक लसीकरण प्रमाणपत्र व सक्षम प्राधीका-यांचे स्वस्थ दाखला प्रमाणपत्र घ्यावे. लंपी चर्म रोग किंवा इतर कोणताही रोग नसलेबाबत पशुपालकांचे संमतीपत्र आवश्यक आहे. प्रत्येक गटातील पशुधनास प्रथम, द्वितीय, तृतीय व अ, ब, क, ड अशाप्रकारे बक्षीस वाटप करण्यात येईल. प्रत्येक गटात दहा पशुधनाचा सहभाग बंधनकारक राहील अन्यथा तो गट होणार नाही व त्या गटातील पशुधनास ग्रेडप्रमाणे अ, ब, क, ड याप्रमाणे बक्षीस वाटप करण्यात येईल. सर्व सहभागी पशुपालकांना बक्षीसाची रक्कम ही संगणक प्रणाली (आर.टी.जी.एस.) द्वारे अदा करण्यात येईल. त्यासाठी नोंदणी करतांना पशुपालकांचे आधारकार्ड व बँक पासबुक झेरॉक्स, लसीकरण केल्याचे प्रमाणपत्र व पशुधंनाचा दाखला देणे बंधनकारक राहील. कुठल्याही परिस्थितीत बक्षिसाची रक्कम ही रोख स्वरुपात दिली जाणार नाही.

पशुपालकांनी आपली बहुमोल पशुधन व्यवस्थित दोरखंडाने बांधुन आपल्या जबाबदारीने आणावे. निवड प्रक्रिया ही पारदर्शक असून निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील. निवड समितीमधील अधिकारी, कर्मचारी यांच्याशी हुज्जत अथवा वाद घालणे, यासारखा अनुचित प्रकार आढळल्यास संबंधित पशुपालकांची नोंदणी रद्द करण्यात येईल. कुठल्याही परिस्थितीत सर्वोत्तम पशुधन (चॅम्पियन) ची निवड केलीजाणार नाही, असे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी कळविले आहे.

असे राहतील पशुधनाचे गट

देवणी नर गट

१) देवणी नर १ वर्षाखालील वासरे गट

२) देवणी नर १ वर्षावरील वासरे गट

३) देवणी नर २ दात वळू गट

४) देवणी नर ४ दात वळू गट

५) देवणी नर ६ दात वळू गट

देवणी मादी गट

१) देवणी मादी १ वर्षाखालील वासरे गट २) देवणी कालवड गट

३) देवणी गाभण गाय गट

४) देवणी गाय / दुधाळ गट

लालकंधारी नर गट

१) लालकंधारी नर १ वर्षाखालील वासरे गट २) लालकंधारी नर १ वर्षावरील वासरे गट ३) लालकंधारी नर २ दात वळू गट

४) लालकंधारी नर ४ दात वळू गट

५) लालकंधारी नर ६ दात वळू गट

लालकंधारी मादी गट –

१) लालकंधारी मादी १ वर्षाखालील वासरे गट२) लालकंधारी कालवड गट

३) लालकंधारी गाभण गाय गट

४) लालकंधारी गाय / दुधाळ गट

संकरित मादी गट –

१) संकरित मादी १ वर्षाखालील वासरे गट २) संकरित कालवड गट

३) संकरित गाभण गाय गट

४) संकरित गाय / दुधाळ गट

अश्व गट

१) अश्व नर गट

२) अश्व मादी गट

कुक्कुट गट

१) देशी कोंबडी गट

२) विदेशी कोंबडी गट

उस्मानाबादी शेळी गट

१) तिन पिल्ले व त्यावरील पिलांची उस्मानाबादी शेळी गट

### विज्ञान, व्यापार, तंत्रज्ञान, स्त्री सक्षमीकरणासह हवामान बदल याविषयांवर एकत्रित कामाची गरज

मुंबई : विधानभवनात वेल्स देशाच्या शिष्टमंडळाने भेट दिली. भारत-वेल्स संबंध, सांस्कृतिक देवाणघेवाण, उद्योग, व्यापार यामध्ये सहकार्य वाढविण्याबाबत आणि संबंध अधिक वृद्धिंगत होण्याविषयी चर्चा झाली. यावेळी विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर आणि विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी आमदार रईस शेख, अमित साटम, अमीन पटेल, सत्यजित तांबे, जयकुमार रावल, असलम शेख, गीता जैन, पत्रकार चैतन्य मारपकवार उपस्थित होते. उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, नुकतीच भारतात जी २० परिषद झाली यामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात शाश्वत विकास साध्य करण्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर आदी विषयावर भर देण्यात आला.

# एमआयडीएसआर दंत रुग्णालय व महाविद्यालयाला ‘नॅक’चे ‘ए’ ग्रेड मानांकन प्राप्त

## मराठवाड्यासह राज्यातील अग्रगण्य दंत रूग्णालय व महाविद्यालय म्हणून दर्जा बहाल

**लातूर, : माईर्स पुणे संचलित एमआयडीएसआर दंत रूग्णालय व महाविद्यालयालयास ‘ए’ ग्रेड मानांकन प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेने (छउ) नुकतेच दंत रूग्णालय व महाविद्यालयाचे मूल्यांकन करून हे मानांकन बहाल केले. या मानांकनामुळे मराठवाड्यासह राज्यातील दंत शाखेचे गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि दर्जेदार दंत रोग उपचार सेवा देणारी एक अग्रगण्य व विश्वसनीय संस्था म्हणून एमआयडीएसआर दंत रूग्णालय व महाविद्यालय सिध्द झाले आहे.**

राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेच्या त्रिसदस्यीय तपासणी समितीने दि. १५ व १६ फेब्रुवारी रोजी लातूर येथील एमआयडीएसआर दंत रूग्णालय व महाविद्यालयास भेट देत रूग्णालय व महाविद्यालयातील पायाभूत सेवा-सुविधासह दंत रूग्णोंपचार कार्यप्रणाली, दंत शिक्षण व दंत रोग उपचार यासाठी अवश्यक अत्याधुनिक उपकरणांची उपलब्धता, दंत शाखेतील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासाठी केलेले कामकाज, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी केलेले विविध प्रकारचे संशोधन व उपक्रमांची माहिती घेतली. त्याचबरोबर मध्यवर्ती सुसज्ञ ग्रंथालय, स्वतंत्र डिजिटल लॅब्ररी, शहरी व ग्रामीण भागातील दंत रोग उपचासाठी कार्यरत तीन सॅटेलाईट सेंटर, जैविक कचरा व्यवस्थापन, विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह व कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था, क्रिडांगण, पर्यावरणपुरक परिसरासाठी सौर उर्जा निर्मीती, जल पुर्नभरण प्रकल्प आणि महाविद्यालय स्तरावरील कार्यरत असलेल्या विविध समित्या, धारेणात्मक स्वरूपात कार्यप्रवण असलेली अंतर्गत गुणवत्ता मापक समिती यासह आदी बाबींची सखोल गुणवत्ता तपासणी या समितीकडून करण्यात आली होती. त्यानंतर अवघ्या दहा दिवसाच्या आतच राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन परिषदेने एमआयडीएसआर दंत रुग्णालय व महाविद्यालयास ‘ए’ ग्रेड मानांकन बहाल केले आहे.

मागील दोन दशकांपुर्वी सर्वसामान्य स्वरूपात सुरूवात करून आज अत्याधुनिक पातळीवर दंत शाखेतील विद्यार्थ्यांना बी. डी. एस. पदवी व एम. डी. एस. पदव्युत्तर पदवीचे गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि दंत रूग्णांना दर्जेदार उपचार सेवा देण्याचे कार्य एमआयडीएसआर दंत रुग्णालय व महाविद्यालयाच्या माध्यमातून अविरतपणे सुरू आहे. येथील उच्च शिक्षित दंत रोग तज्ज्ञांकडून विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण शिक्षण आणि रूग्णांना तत्परतेने दंत उपचार सेवा दिली जात आहे. त्यामुळे या महाविद्यालयातून दंत शाखेतील पदवी आणि पदव्यत्तर पदवीचे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांचा ओढा असून दर्जेदार आणि तत्पर दंत रोग उपचार सेवेमुळे दिवसेंदिवस रूग्णांची गर्दी वाढत चालली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि दर्जेदार दंत रोग उपचार सेवेचे फलस्वरूप म्हणून राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन परिषदे कडून या दंत रूग्णालय व महाविद्यालयास ‘ए’ ग्रेड मानांकन प्राप्त झाले आहे. या नॅक मूल्यांकनासाठी दंत रूग्णालय व महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

एमआयडीएसआर दंत रुग्णालय व महाविद्यालयालयास ‘नॅक’चे ‘ए’ ग्रेड मानांकन मिळाल्याबद्दल माईर्स एमआयटी पुणेचे संस्थापक-विश्वस्त प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड, कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व रूग्णांचे अभिनंदन केले आहे.

# सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी नागरिकांनी इंटरनेटच्या वाढत्या वापरात स्वत:ला सजग ठेवणे आवश्यक आहे : प्रा. विकास नाईक

**लातूर : आज मोबाईल - इंटरनेटचा वापर न करणारी व्यक्ती दिसणार नाही, असे कदापि होऊ शकत नाही. इंटरनेटच्या वाढत्या वापराने व्यक्ती नकळतपणे सायबर गुन्ह्यात अडकू शकते. त्याकरिता सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी नागरिकांनी स्वतः ला सजग ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, नव्हे तर ती काळाची गरज आहे असे प्रतिपादन नाशिकचे सायबर लॉ तज्ज्ञ प्रा. विकास नाईक यांनी केले.**

महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्स संघटनेच्या स्टडी सर्कलचे ( कायदेविषयक माहिती ) उद्घाटन गुरुवारी सकाळी दयानंद सभागृहात ऑल इंडिया फेडरेशन ऑफ वुमेन लॉयर्सच्या उपाध्यक्षा एड. जयश्री अकोलकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य एड. अण्णाराव पाटील हे होते. यावेळी ऑल इंडिया फेडरेशन ऑफ वुमेन लॉयर्सच्या उपाध्यक्षा एड. जयश्री अकोलकर, फेडरेशनच्या माजी अध्यक्षा एड. निलिमा वर्तक, एड. बळवंत जाधव, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्स संघटनेच्या अध्यक्षा एड. जयश्रीताई पाटील, पोलीस नियंत्रण कक्षातील सायबर सेलच्या पोलीस निरीक्षक नलिनी गावंडे, लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष एड. महेश बामणकर, दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या पूनम नाथानी, एड. विद्या कोसमकर , एड. कांचन कांदे यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्स , दयानंद विधी महाविद्यालय आणि लातूर जिल्हा वकील मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

नाशिकचे सायबर लॉ तज्ज्ञ प्रा. विकास नाईक यांनी यावेळी ’



सायबर सेक्युरीटी’ या विषयावर अत्यंत विस्तृत असे मार्गदर्शन केले. इंटरनेटसोबत जगणे जेवढे सहज, सोपे आहे तेवढेच या माध्यमातून बदनामीही होण्याची शक्यता अधिक असल्याचे सांगून प्रा. विकास नाईक पुढे म्हणाले की, पूर्वी चोरी, दरोड्यासारखे गुन्हे घडायचे. आता बदलत्या काळात सायबर गुन्हेगार आपला संगणक, लॅपटॉप व्हायरसच्या माध्यमातून डाटा ब्लॉक करून खंडणी उकळतात. तंत्रज्ञानाने जेवढ्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत, तेवढेच त्याचा दुरुपयोगही केला जात असल्याचे निदर्शनास येते. डिजिटल पेमेंट्सच्या बाबतीत होणारी आर्थिक लूट न दिसणारी असे असेही त्यांनी सांगितले. ऑनलाईन बँकिंगच्या माध्यमातून घडलेल्या लुटीच्या सायबर गुन्ह्यात पोलीस आणि संबंधितात ताळमेळ असणे खूप गरजेचे असते. ताळमेळ असेल तरच पैसे दोन तासात परत येऊ शकतात, अन्यथा परत येत नाहीत. वर्ष २०१७ मध्ये एकूण २०७१ कोटींचे डिजिटल पेमेंट्सचे व्यवहार झाले होते. तर २०२२ - २०२३ पर्यंत हे व्यवहार १३ हजार ४६२ कोटी रुपयांचे झाले होते. एवढ्या मोठ्या आर्थिक व्यवहारात नक्कीच अनुचित गुन्हेही घडले, हे मान्यच करावे लागेल. प्रत्येक कार्ड, यूपीआय, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग मध्ये सायबर गुन्ह्याचे स्वरूप हे वेगवेगळे असते. ऑनलाईन शॉपिंगमध्ये तर समोरच्याला वेड्यात काढून फसवणूक केली जाते. आपल्याकडे गप्पा मारण्याला प्राधान्य देणारी मंडळी अधिक आहेत. यातून उपयोगात येणाऱ्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातूनही गंडवणूक केली जाते, हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. सायबर गुन्ह्यात आपले आधारकार्ड, आयकार्डचाही गैरवापर केला जाण्याची अथवा केला गेल्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण याबाबतीत सामान्य नागरिक आणखी म्हणावा तेवढा जागरूक झालेला नाही. सन २०२० मध्ये आपल्या देशात ५० हजार ३५ सायबर गुन्हे दाखल झाले होते. आता हा आकडा निश्चितच वाढणार आहे. ऑनलाईन शॉपिंगमध्ये एक हजार रुपयांची वस्तू पाच हजारांची असल्याचे दाखवून ती पन्नास टक्के सूट देऊन विकली जाते. म्हणजे हाही सायबर गुन्ह्याचाच एक प्रकार असल्याचे सांगून प्रा. नाईक यांनी नागरिकांना सजग राहणायचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एड. महेश बामणकर यांनी केले. एड. जयश्रीताई पाटील यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. यावेळी एड. निलीमा वर्तक, एड. जयश्री अकोलकर, एड. बळवंत जाधव, नलिनी गावंडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. एड. अण्णाराव पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एड. तृप्ती इटकरी व एड. पल्लवी कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन एड. किरण चिंते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एड. सुरेखा जाकते , एड. अरुणा वाघमारे, एड. पूनम सुरकुटे , एड. सुनंदा इंगळे, एड. बबिता संकाये, एड. गिरवलकर यांसह वूमेन फेडरेशन व जिल्हा वकील मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये मराठी भाषा गौरवदिन उत्साहात

लातूर, - शारदा सेमी इंग्लिश स्कूल येथे रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी भाषा गौरवदिन उत्साहात साजरा करण्यात आला.



अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्रा. एल. टी. पुरी हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उत्तम जाधव उपस्थित होते. यावेळी समन्वयक रोहित जाधव, मानसी पाटील, दर्शना बोराडे यांची उपस्थिती होती.

प्रारंभी ग्रंथ दिंडी काढण्यात आली. यावेळी पोवाडा, कविता वाचन, मराठी गीत गायन, कादंबरीतील काही अंशाचे अभिवाचन आदी विद्यार्थ्यांनी सादर केले. यानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानिमित्त शिक्षिका व विद्यार्थ्यांनी मराठमोळा, पारंपारिक पोशाख परिधान केला होता. त्यामुळे सर्व वातावरण मराठीमय झाले होते. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनघा पाटील यांनी तर प्रास्ताविक रोहिणी कदम यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार समरजीत ढगे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राज्यगीताने झाली.

### दुष्काळामुळे बाधित शेतकऱ्यांना मदतीपोटी दोन हजार कोटींवर निधी वितरणास मान्यता; शासन निर्णय निर्गमित

मुंबई :- नैसर्गिक आपत्तीत राज्य शासन नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम उभे राहत असून खरीप हंगाम-२०२३ मध्ये दुष्काळामुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानासाठी बाधित शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मदतीपोटी २ हजार ४४३ कोटी २२ लाख ७१ हजाराचा निधी वितरणास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. दुष्काळामुळे बाधित शेतकऱ्यांना हा निधी उपलब्ध होणार असल्याने या शेतकऱ्यांना मदत व दिलासा मिळेल. तसेच या निर्णयामुळे राज्य शासनाने आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मदतीच्या दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली असल्याचा विश्वास, मदत व पुनर्वसन आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांनी व्यक्त केला. मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले, राज्यातील ४० तालुक्यांमध्ये खरीप हंगाम २०२३ मध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. या तालुक्यातील बाधित शेतकरी खातेदारांना कृषीविषयक मदतीसाठी निविष्ठा अनुदान अनुज्ञेय करण्यात आले. त्यानुसार दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांमधील खातेदारांना कृषी विषयक मदतीसाठी निविष्ठा अनुदान वाटप करण्याकरिता ३३ टक्केपेक्षा अधिक नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना ही मदत होणार आहे. हा शासन निर्णय निर्गमित झाल्यामुळे दुष्काळामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात मिळाला असल्याचे मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले. खरीप हंगाम-२०२३ मध्ये दुष्काळामुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानासाठी हा निधी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी व राज्य शासनाच्या निधीमधून नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानासाठी २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत देण्यास मान्यता दिली असल्याचेही मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले.

## जिल्ह्यात गुंतवणुकीसाठी ९५ उद्योग घटकांसोबत झाले १ हजार ३४० कोटींचे सामंजस्य करार

लातूर, (जिमाका): जिल्ह्यात उद्योग क्षेत्रात गुंतवणुकीला



चालना देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राच्यावतीने आज लातूर येथील हॉटेल ग्रँड सरोवर येथे राज्यातील पहिली जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद पार पडली. जिल्ह्यात गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी गुंतवणूकदार व व्यावसायिक यांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी ही परिषद आयोजित करण्यात आली होती. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत झालेल्या या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत ९५ उद्योग घटकांसाठी सामंजस्य करार करण्यात आले.

यावेळी छत्रपती संभाजीनगर विभागाचे उद्योग सहसंचालक बी. टी. यशवंते, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे विभागीय व्यवस्थापक अविनाश कामतकर, ‘मैत्री’ कक्षाचे पद्माकर हजारे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी अमित भामरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण खडके, व्यवस्थापक गोपाळ पवार यांच्यासह उद्योजक, बँकेचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

जिल्हातील गुंतवणूक वाढवणे व नव उद्योजकांना आकर्षित करणे, जिल्ह्यातील गुंतवणूकदार आणि व्यावसायिकांना एकत्र आणून लातूर जिल्हा हा विकासासाठी केंद्र बिंदू मानून जिल्ह्याच्या व राज्याच्या विकासाला चालना देणे हा जिल्हा गुंतवणूक परिषदेचा उद्देश आहे या परिषदेत झालेल्या सामंजस्य करारानुसार जिल्ह्यात ९५ उद्योग स्थापन होणार असून यामध्ये सुमारे १ हजार ३४० कोटी रुपये गुंतवणूक होईल. तसेच यामधून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरुपात ३ हजार ७५८ रोजगार निर्माण होतील, असे उद्योग सहसंचालक बी. टी. यशवंते यांनी प्रास्ताविकात सांगितले.

### जिल्हास्तरीय उद्योग परिषदेतून नवउद्योजक घडतील : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

जिल्ह्यात नुकताच विभागीय नमो महारोजगार मेळावा झाला. यामध्ये हजारो मुलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. आता राज्यातील पहिली जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद लातूर येथे होत आहे. या माध्यमातून नवउद्योजक निर्माण होण्यास मदत होणार आहे. तसेच या क्षेत्रात येण्यासा युवक-युवतींनाही प्रेरणा मिळेल. जिल्ह्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत चागंले काम झाले आहे. या योजनेचे उद्दिष्ट पूर्ण करणारा लातूर हा राज्यातील पहिला जिल्हा ठरला आहे. लातूर जिल्ह्यात उद्योग-व्यवसाय विकसित होण्यासाठी सर्वांनी एकत्र येवून प्रयत्न करूया, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले. लातूर जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग उभा राहणे आवश्यक आहे. यादृष्टीने स्थानिक युवकांनी पुढाकार घ्यावा, असेही जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या.

जिल्हास्तरीय उद्योग परिषदेनिमित्त आयोजित प्रदर्शनीतील उद्योजकांच्या दालनांना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यांनी भेटील दिल्या. तसेच त्यांच्याकडून उद्योगाबाबत माहिती जाणून घेतली.

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर, (जिमाका): राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे शुक्रवार, १ मार्च २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांचे १ मार्च रोजी दुपारी १ वाजता लातूर विमानतळावर आगमन होईल व राखीव. दुपारी २ वाजता हेलिकॉप्टरने उदगीरकडे प्रयाण करतील. दुपारी २.३० वाजता उदगीर सोमनाथपूर येथील हेलिपॅडवर त्यांचे आगमन होईल. सायंकाळी ५ वाजता पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग व लातूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने उदगीर तालुका क्रीडा संकुल येथे आयोजित ‘मराठी बाणा’ कार्यक्रमास ते उपस्थित राहतील. सोयीनुसार उदगीर येथून लातूरकडे प्रयाण करतील.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे महामंडळामार्फत युवक-युवतींना मिळणार व्यवसाय प्रशिक्षण

लातूर, (जिमाका): साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे महामंडळाच्या लातूर जिल्हा कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकास व उद्योजकता कार्यक्रम २०२४-२०२५ अंतर्गत युवक-युवतींना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी लातूर जिल्ह्यातील समाज व तत्सम १२ पोटजातीतील वय १८ ते ५० वयोगटातील लाभार्थी, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी १५ मार्च २०२४ पर्यंत महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात अर्ज दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशिक्षण घेण्यास इच्छुकांनी अधिक माहितीसाठी महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक, साहित्यरत्न लोकशाही अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ मर्यादीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बी विंग, तळमजला, शिवनेरी गेटसमोर, डाल्डा फॅक्टरी, लातूर यांच्याकडे संपर्क साधावा, असे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

### ‘खेलो इंडिया’ अंतर्गत लातूर येथे मुला-मुलींसाठी कुस्ती प्रशिक्षण निवड चाचणीचे आयोजन

लातूर, (जिमाका): भारतीय खेल प्राधिकरण व राज्य शासनाचे क्रीडा युवक सेवा संचालनालय अंतर्गत लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे ५ मार्च, २०२४ रोजी खेलो इंडिया कुस्ती केंद्रामध्ये मुला-मुलींची निवड चाचणी घेण्यात येणार आहे. या खेलो इंडिया कुस्ती केंद्रात मोफत कुस्ती प्रशिक्षण देण्यात येत आहे. या निवड चाचणीद्वारे नियमित कुस्ती प्रशिक्षण घेवू इच्छिणाऱ्या प्रतिभा संपन्न अनिवासी कुस्ती खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे, तरी लातूरमधील कुस्तीगिरांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.

या चाचणीसाठी येताना जन्मतारखेचा दाखला, दोन फोटो, रहिवासी प्रमाणपत्र, खेळाचे प्रमाणपत्र (असल्यास) सोबत आणावे. अधिक माहितीसाठी लातूरचे खेलो इंडिया कुस्ती मार्गदर्शक चेतन संभाजी जावळे (भ्रमणध्वनी क्र. ९९६०१५९७९८) यांच्याशी संपर्क साधावा. या चाचणीसाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. लकडे यांनी केले आहे. प्रशस्त मॅट हॉल, क्रीडा साहित्य सोई-सुविधायुक्त भव्य क्रीडांगणयुक्त खेलो इंडिया कुस्ती केंद्र. अनुभवी तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून शास्त्रशुध्द तंत्र प्रशिक्षण.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894